**म.सं.कौ.हिं.का.अर्ज क्र. ११४/२०२२ निशाणी क्र. ३१/क**

**<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. १ चा पुढील उलटतपास शपथेवर सुरू</u>**

**<u>उलटतपास वि.प.तर्फे विधीज्ञ श्री. रूईकर वकिल.</u>**

१३. प्रशांत पाटील, विनायक पाटील हे माझे मावसभाऊ आहेत. ते रांगोळी येथे राहतात. माझा व प्रशांत पाटील, विनायक पाटील यांचा जन्मापासून परीचय आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रशांत पाटील, विनायक पाटील हे माझे मावसभाऊ आहेत हे मी खोटे सांगत आहे. मी प्रशांत पाटील व विनायक पाटील यांना साक्षीदार म्हणून तपासणार नाही. मी माझ्या आईला व वडीलांना साक्षीदार म्हणून तपासणार आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. २६/०४/२०२० ते दि. २४/०५/२०२१ पर्यंत मी वि.प.विरूध्द तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे वि.प.विरूध्द तक्रार करण्याचे कोणतेही कारण नव्हते. दि. २४/०५/२०२१ ते दि. २०/०८/२०२२ च्या कालावधीमध्ये मी सरकारी कार्यालयात तसेच बाहेरही जात-येत होते. मी ज्या ठिकाणी करार दस्त केले तेथून पोलीस ठाणेचे अंतर १० मिनीट अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा छळ होतोय म्हणून पोलीस ठाणेत वि.प.विरूध्द वरील कालावधीमध्ये तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या अर्जामध्ये माझा छळ होत असल्याबाबतची बाब माझ्या आईवडीलांना कळविले अशी बाब नमुद नाही. मला तशी बाब नमुद करायला काही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वस्तु, भांडी कुंडी, दागिने परत मिळावेत म्हणून माझ्या अर्जात उल्लेख केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जामध्ये तसा उल्लेख करायला मला काही अडचण नव्हती. माझ्या लग्नाची यादी या केसकामी दाखल केली नाही. माझ्या लग्नामध्ये आईवडीलांकडून आलेल्या वस्तुची यादी या कामी हजर केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घरातून बाहेर पडल्यानंतर मी कर्ज प्रकरण केले. हे म्हणणे खरे नाही की, कर्ज प्रकरणात वि.प.अडचण करेल म्हणून मी घरातून बाहेर पडले. हे म्हणणे खरे आहे की, वि.प.च्या घरापेक्षा आता मी राहते ते घर, आर.सी.सी.बांधकाम व छान आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या घरात राहते त्या घरात सर्व सुख सोई आहेत. बॅकेची उतारे मी या कामी हजर केले आहेत त्यास निशाणी क्रमांक देण्यास हरकत नाही. त्यातील नोंदी ख-या व बरोबर आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला कोणकोणत्या मार्गाने पैसे मिळतात त्याच्या नोंदी बॅकेच्या उता-यामध्ये दिसून येतात. हे

म्हणणे खरे नाही की, मला निरनिराळ्या मार्गातून मिळणारे पैसे, किसान योजनेचे, लाडक्या बहिण योजनेचे पैसे मिळतात हे मी माझ्या शपथपत्रामध्ये जाणूनबजून नमुद केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ व २०१९ साली माझे खरेदीखते रद्द करून मिळावे म्हणून वि.प.१ने माझ्या विरोधात न्यायालयात दावा दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ साली मला खरेदीखताला कोठून पैसे मिळाले हे माझ्या अर्जामध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा घरखर्च हा निम्मा झाला असेल कारण मी अर्धा घरखर्च करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, वि.प.१ ने माझ्या विरूध्द खरेदीखत रद्द होवून मिळावे म्हणून दावा दाखल केला त्यानंतर मी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दाव्याला शह मिळावा म्हणून मी सदरचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण- इचलकरंजी
दिनांक- ०६/१२/२०२५.

(**डी.बी.साठे**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २,
इचलकरंजी.